# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्रमांक १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१.
दू. क्र. : ०२२ ६६४०५०६६, ६६४०६०६७, ६६४०५०७७ संकेतस्थळ : https://mhada.gov.in


जा.क्र. जसंवि / प्रसिद्धी पत्रक / २३०० दि. ०५/०८/२०२१

प्रसिद्धी पत्रक

**मुंबईतील चाळीतील ऐतिहासिक घटनांचा उलगडा करणारे " चाळींतले टॉवर " कॉफी टेबल बुक म्हाडातर्फे प्रकाशित**

मुंबई , ०५ ऑगस्ट, २०२१ : मुंबईच्या चाळी ह्या मुंबईचे वैभवच आहेत. मुंबईच्या सामाजिक राजकीय सांस्कृतिक जडणघडणीत महत्त्वाचा घटक असलेल्या या चाळींमध्ये अनेक थोर व्यक्ती जन्मल्या, वाढल्या त्यांनी समाजाला दिलेल्या योगदानाच्या,ऐतिहासिक घटनांचा या चाळी खऱ्या अर्थाने साक्षीदार आहेत. चाळींच्या या सामाजिक जीवनाचा वारसा शब्दबद्ध करावा असा विचार राज्याचे गृहनिर्माण मंत्री श्री.जितेंद्र आव्हाड यांनी मांडला आणि यातून "चाळींतले टॉवर " या कॉफी टेबल बुकची निर्मिती करण्यात आली.

स्वातंत्र्यपूर्व काळात औद्योगिकरणानंतर महानगरी मुंबईतील वाढत्या लोकसंख्येला निवारा देण्यासाठी अनेक चाळी उभारण्यात आल्या. भायखळा, लालबाग, परळ, नायगाव, दादर, गिरगाव या परिसरातील चाळींमधून गिरण्यांना कामगारांचा आणि कचेऱ्यांना कर्मचाऱ्यांचा पुरवठा होऊ लागला. याच लोकांमधून मुंबईला एक वेगळी संस्कृती लाभली, एक मध्यमवर्गीय चेहरा दिला. अवघ्या समाजाचे आभाळ आपल्या कार्यकर्तृत्वाने पेलणारी व्यक्तिमत्वे याच वास्तूंमधून जन्माला आली. या थोर व्यक्ती, समाजसुधारक, क्रांतिकारक, साहित्यक, शाहीर, कवी, कलावंत तसेच व्यापारी-उद्योजकांच्या रूपाने या चाळींमधून महान झाली. चाळींविषयीच्या ऐतिहासिक मूल्यांचा उलगडा करणाऱ्या या कॉफी टेबल बुकची मांडणी दोन पातळ्यांवर करण्यात आली आहे. तो म्हणजे चाळी व त्यातील उत्तुंग चाळकरी. या पुस्तकामध्ये २५ महनीय 'चाळकरी' व्यक्तिमत्तवांची माहिती, त्यांची दुर्मिळ पोर्ट्रेट्स आणि ते ज्या चाळीत वास्तव्यास होते अशा चाळींची छायाचित्रे आहेत. यामध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर, प्रबोधनकार केशव ठाकरे, थोर जसहीततक अण्णा भाऊ साठे , लोकनेते श्रीपाद अमृत डांगे, महाराष्ट्रभूषण पु. ल. देशपांडे, जेष्ठ साहित्यिक नामदेव ढसाळ, कवी मंगेश पाडगावकर , क्रिकेट विश्वातली उत्तुंग व्यक्तिमत्व सुनील गावस्कर उद्योगपती धीरूभाई अंबानी अशा उत्तुंग व्यक्तिमत्त्वांचा समावेश आहे. या कॉफी टेबल बुक च्या निमित्ताने समाजातील उत्तुंग व्यक्तिमत्वाची माहिती, त्यांच्या वास्व्याने पुनीत झालेल्या चाळींच्या संग्रह किंवा सरकारीदस्तऐवज पहिल्यांदाच तयार झाला आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळ असो वा स्वातंत्र्योत्तर, वा संयुक्त महाराष्ट्राची चळवळ या काळात मुंबईमध्ये झालेल्या विविध चळवळींमध्ये चाळींनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. विविध आंदोलनात काही चाळी आघाडीवर राहिलेल्या आहेत. अशा चाळींचा आढावा घेणारे "आंदोलनातील चाळी" असे एक प्रकरणही या पुस्तकात देण्यात आले आहे. बीआयटी आणि बीडीडी चाळी यांना मुंबईतील कामगार विश्वात महत्वाचे स्थान आहे. त्या चाळींचा इतिहास हा मुंबईच्या एका कालखंडाच्या इतिहासाचाच भाग आहे. तो सर्व रंजक इतिहास सांगणारे स्वतंत्र प्रकरण या पुस्तकात आहे. याशिवाय पु. ल. देशपांडे, तसेच पट्ठे बापूराव यांनी मराठी साहित्यात अजरामर केलेली बटाट्याची चाळ, मुंबईतील सार्वजनिक गणेशोत्सवाची मुहूर्तमेढ रोवणारी केशवजी नाईक चाळ, स्वातंत्र्याच्या तसेच सयुंक्त महाराष्ट्राच्या लढ्यामध्ये आघाडीवर राहणारी, या संघर्षाला सर्वतोपरी रसद पुरवणारी

जगन्नाथ चाळ, लक्ष्मी कॉटेज चाळ यांची माहिती या पुस्तकात आहे; तसेच गिरणगावची संस्कृती पेलून धरणारी रंगारी बदक चाळ, तेजुकाया मॅन्शन, राष्ट्रीय विचारांनी भारून गेलेली पूर्वाश्रमीची लखू इराण्याची आणि आताची केरमानी ही 'व्ही' आकाराची चाळ यांचा इतिहासही जागविण्याचा प्रयत्न येथे करण्यात आला आहे.

तसेच या पुस्तकातील सर्व माहिती ही पूर्णतः तथ्यांवर आधारित आहे. त्याकरिता रिसर्च टीमकडून संशोधनाची प्रामुख्याने दोन साधने वापरली गेली आहेत. एक म्हणजे इतिहासाच्या पुस्तकांतून, चरित्रे वा आत्मचरित्रे यांतून, तसेच जुन्या लेखांतून संदर्भ संपादन केले आहेत, आणि दुसरे मौखिक इतिहासातून माहिती घेतली आहे, या करिता त्या-त्या चाळींना प्रत्यक्ष भेट देऊन, तेथील जुन्या लोकांकडून माहिती घेण्यात आली आहे. चाळींविषयीच्या अभ्यासकांकडून संदर्भांची खात्री करून घेतली आहे. एकूण सर्व माहिती ही खात्रीलायक स्तोत्रांवरच आधारलेली असल्याने हा इतिहासातील एक बहुमोल ठेवा ठरेल, असा यामागील प्रयत्न आहे. कॉफी टेबल बुकमधील सर्वांत महत्वाचा भाग म्हणजे छायाचित्रे आणि चाळींची संस्कृती छायाचित्रांतून दिसावी आणि त्या द्वारे चाळींमध्ये छायाचित्रात्मक डॉक्युमन्टेशन व्हावे या हेतूने कॉफी बुकची मांडणी करण्यात आली आहे. त्यायोगे सामान्य वाचक प्रेक्षकाप्रमाणेच मुंबईच्या अभ्यासकांनाही हे पुस्तक उपयुक्त ठरू शकेल.

म्हाडाचा घटक असलेल्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. अरुण डोंगरे यांच्या नेतृत्वाखाली मुख्य जनसंपर्क विभागातर्फे चाळींतील टॉवर हे कॉफी टेबल बुक संपादित आणि प्रकाशित करण्यात आले आहे. चाळींतले टॉवर" या कॉफी टेबल बुक चे अनावरण राज्याचे मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांच्या हस्ते व खासदार शरद पवार, गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड याच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी वरळी येथे बीडीडी चाळ पुनर्वसन प्रकल्पांतर्गत पुनर्वसन इमारतींच्या बांधकामाचा शुभारंभ कार्यक्रमात करण्यात आले. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री अजित पवार (दूरदृश्य प्रणालीद्वारे), महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड,अल्पसंख्याक विकास मंत्री नवाब मलिक,वस्त्रोद्योग मंत्री तथा मुंबई शहर पालकमंत्री अस्लम शेख, पर्यटन मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आदित्य ठाकरे, गृहनिर्माण राज्यमंत्री सतेज ऊर्फ बंटी डी पाटील पाटील, मुंबईच्या महापौर श्रीमती किशोरी पेडणेकर, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सभापती विनोद घोसाळकर, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाचे सभापती विजय नाहटा, खासदार अरविंद सावंत, खासदर राहुल शेवाळे, आमदार सदा सरवणकर,आमदार अजय चौधरी, मुख्य सचिव सीताराम कुंटे, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त इक्बाल सिंग चहल, गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव मिलिंद म्हैसकर, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल डिग्गीकर, मुंबईचे पोलीस आयुक्त हेमंत नगराळे, म्हाडा मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी डॉ. योगेश म्हसे, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी अनिल डोंगरे, म्हाडाचे मुख्य अभियंता सुनील जाधव, माजी मंत्री सचिन अहिर, माजी आ.सुनील शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

-----*****----


मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा विभागीय घटक)
बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प वरळी येथील पुनर्वसन इमारती बांधकाम
शुभारंभ
PicbyRajeshWaradkar


चाळीतले टॉवर